(नि.क्र.३७) वरील आदेशानुसार प्रस्तुत साक्षीदाराचा उलट तपास

नियमीत दिवाणी दावा क्र. ४७१/२०२२ निशाणी क्र.३३ खाली

**वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एम. सुर्यवंशी यांच्यामार्फत वा.सा.क्र.१ चा उर्वरित सर तपास शपथेवर सुरु**

१३. माझ्या साक्षीपुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर असून तो मला मान्य आहे. तसेच त्यावर माझी स्वाक्षरी आहे, ती मी ओळखतो.

पुढील सर तपास संपला.

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. काळेगोरे यांच्यामार्फत वा.सा.क्र.१ चा उलट तपास शपथेवर सुरु**

१४. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी लक्ष्मीबाई यांची गट क्र.३ मध्ये ७१ आर जमीन आहे. आता मला गट क्र.३ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. त्यामध्ये लक्ष्मीबाईच्या नावे ७१ गुंठे जमीन आहे. सदर दस्त उलट तपासादरम्यान साक्षीदारास दाखविल्याने तसेच तो सार्वजनिक असल्याने त्यास **नि.क्र.३९** देण्यात येत आहे. सदर जमीन लक्ष्मीबाई यांना न्यायालयीन हुकूमनाम्याद्वारे मिळाली आहे किंवा कसे, हे मला माहित नाही.

१५. आमची जमीन गट क्र.४ मध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.३ व ४ यांच्यामधून नांदेड–बीदर राज्य महामार्ग गेलेला आहे. मला आता भूमी अभिलेख कार्यालयाने गट क्र.३ व ४ चा जारी केलेला संयुक्त टोच नकाशा दाखविण्यात आला. त्यामध्ये त्रिकोणी आकारात दर्शविलेली जमीन ही आमची गट क्र.४ मधील जमीन आहे. तसेच स्वतंत्र गट क्र.३ मध्ये दर्शविलेली जमीन ही लक्ष्मीबाई यांची आहे. सदर दस्त उलट तपासादरम्यान साक्षीदारास दाखविल्याने तसेच तो सार्वजनिक असल्याने त्यास **नि.क्र.४०** देण्यात येत आहे. आमची गट क्र.४ मधील जमीन ही अगोदर माझ्या वडिलांच्या नावावर होती. माझ्या वडिलांचे नाव गुणवंत रावसाहेब बिरादार असे आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत ही माझ्या वडिलांच्या नावामध्ये दुरूस्ती करून नावे करून घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. माझी जमिन त्रिकोणी आकाराची आहे. माझ्या जमिनीच्या त्रिसीमा मला सांगता येतात. पुर्वेकडे – लक्ष्मीबाई, पश्चिमेकडे –

नांदेड–बीदर राज्य महामार्ग आणि उत्तरेकडे – प्रेमसागर व ज्ञानोबा जाधव यांची जमीन आहे. उपरोक्त त्रिसीमा दर्शविणारा कोणताही कागद माझ्याकडे नाही. प्रस्तुत दावा हा मी मला प्रतिवादी हे हरकत अडथळा करतात, म्हणून दाखल केलेला आहे.

प्रश्न– तुम्हाला नेमका कधी हरकत अडथळा केला आहे?

उत्तर– दिनांक ०५.०६.२०२२ रोजी हरकत अडथळा केलेला आहे.

१७. त्याबाबतचा कोणताही प्रथम खबर अहवाल माझ्याकडे नाही. यातील प्रतिवादीने माझ्याविरूद्ध प्रथम खबर अहवाल नोंद केला आहे किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याविरूद्ध महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४४ अन्वये कारवाई चालु आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यामध्ये निकाल लागलेला आहे.

१८. प्रतिवादीच्या नावे ७१ गुंठे जमीन कोणत्या आधारे आली, हे मला माहिती नाही. प्रतिवादीचे पती भोळसर आहेत किंवा कसे, हे मला माहित नाही. मी मौजे एकुर्का रोड व उदगीर या दोन्ही ठिकाणी राहतो. मी उदगीरमध्ये राहत असल्याबाबत माझ्या दाव्यात नमूद नाही. प्रतिवादी ही तिच्या कुटुंबियांसह उदगीर येथे राहते किंवा कसे, हे मला माहित नाही. प्रतिवादी ही उदगीरहून एकुर्का येथे जाणे येणे करून शेती करते किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या मागे पुढे पाहण्यास कोणीही नसल्याचा फायदा घेवून तसेच तिची मिळकत हडप करण्याच्या कुहेतुने मी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा व खाटे शपथपत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2025.08.30 17:17:03 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : ३०.०८.२०२५

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

उदगीर